MHKO120003152018

## निशाण क्रमांक ०५ वरील आदेश.

प्रस्तुतचा अर्ज वादींनी प्रतिवादींविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १ व २ अन्वये तुर्तातुर्त मनाईकरिता दाखल केला आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन :-**

२. मौजे आकुर्डे, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर येथील गट क्र.१३१६, एकुण क्षेत्र ०हे. ९९.५ आर, आकार ९ रु. ९२ पै., सदर मिळकतीची चतुःसिमा. पुर्वेस – मौजे आकुर्डे गावचे गांवठाण, पश्चिमेस – गट क्र. ५६१ व १३१५, दक्षिणेस – गट क्र.६५६, उत्तरेस – गट क्र.१३२०. ( येथुन पुढे सदर मिळकतीस दावा मिळकत असे संबोधण्यात आलेले आहे. )

३. वादी यांची थोडक्यात केस अशी की, सदरची दावा मिळकत ही वादी व अन्य सहहिस्सेदारांचे मालकी वहिवाटीची मिळकत आहे. सदर मिळकतीमधुन दक्षिण-उत्तर गारगोटी-पाटगांव रस्ता वादींच्या घराच्या पुर्वेकडून गेलेला आहे. दावा मिळकतीमध्ये वादींची राहती घरे आणि घराशेजारी शिल्लक क्षेत्रामध्ये वादींची भात, उस ही पिके आहेत. सदर मिळकतीशी प्रतिवादी ग्रामपंचायत यांचा कोणत्याही प्रकारचा संबध नाही. तसेच दावा मिळकतीमध्ये दक्षिण-उत्तर गारगोटी- पाटगांव या रस्त्याव्यतिरीक्त अन्य कोणताही रस्ता नाही.

४. असे असताना सदर दावा मिळकतीमधून गावातील विघ्नसंतोषी लोकांच्या सांगणेवरुन मा. शाखा अभियंता, सार्वजनीक बांधकाम विभाग, भुदरगड यांनी रस्ता काढणेस सुरवात केली. म्हणून वादींनी मा. जिल्हाधिकारीसाो, कोल्हापूर व इतर ५ विरोधात कोल्हापूर न्यायालयात रे. क. क्र.१६१३/२०१२ चा मनाईचा दावा दाखल केला होता. तो गुणदोषावर चालुन दिनांक २४/११/२०१४ रोजी वादींच्या लाभात निकाली झाला आहे. तसेच याबाबतची पूर्ण माहिती यातील प्रतिवादी यांना आहे.

५. वादी पुढे असे कथन करतात की, वादी क्र.१ व प्रतिवादी क्र. १ हे आकुर्डे ग्रामपंचायत मधील सन २०१७-२०२१ च्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये सरपंच पदासाठी परस्पर विरोधी गटामध्ये होते. याचाच राग धरुन प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ यांना

हाताशी धरुन वादींच्या दावा मिळकतीमधील दक्षिण बाजूस पुर्व-पश्चिम असा १० फुटी रस्ता करणेची आखणी केली व दिनांक २७/०६/२०१८ रोजी ग्रामपंचायतमार्फत वादींचे अपरोक्ष वादींना कोणतीही कल्पणा न देता मुरुम टाकणेचे काम प्रतिवादी यांनी सुरु केले. प्रतिवादी यांचे सदरचे कृत्य हे कायद्याच्या विरोधात असुन वादींच्या हक्कावर गदा आणणारे आहे. तसेच, प्रतिवादी यांनी वादींच्या मिळकतीमध्ये सत्तेच्या जोरावर व घाईगडबडीने रस्ता केलेस वादींचे असलेले भात पिकांचे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी वादींच्या हद्दीमध्ये रस्ता किंवा अन्य कोणतेही कृत्य करु नये यासाठी प्रतिवादी विरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश होणेसाठी वादी यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

६. यातील प्रतिवादी क्र.१ व २ यांनी अनुक्रमे निशाण क्र. २८ व २१ कडे आपले म्हणणे सादर केले आहे. त्यांनी वादींच्या कथनांचा स्पष्टपणे इन्कार केला आहे. तसेच वादी यांनी प्रतिवादी क्र.१ व २ यांना केवळ त्रास देण्यासाठी व राजकिय द्वेशापोटी सदरचा दावा दाखल केला आहे असे कथन केले आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या म्हणण्यानुसार त्यांचा दावा मिळकतीशी कोणताही संबध नाही. तसेच वादींच्या रे. क. क्र. १६१३/२०१२ या प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र.१ व २ यांना केव्हाही पक्षकार केलेले नव्हते. वादी कथन करतात तो रस्ता दावा मिळकतीमध्ये नमुद नसुन तो गट क्र.६५६ या मिळकतीस लागून गेलेला असुन सदर रस्त्यालगत श्री. अतुल गणपती कोराणे यांची मिळकत आहे. तसेच त्या रस्त्यावरील मुरुम हा तेथील लोकांनी, बापू रबाडे, सदाशिव भंदिगरे, मंगल कोराणे, राजेंद्र व्हरांबळे, छाया मलकर, बापूर रबाडे यांनी त्यांना पावसाळ्यामध्ये येणे जाणेसाठी सोईचे व्हावे याकरीता टाकलेला आहे. सदर लोकांशी वादी यांचा कोणताही संबध नसल्यामुळे त्यांना सदर दाव्यामध्ये पक्षकार करण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर दाव्यास Non Joinder of necessary parties या कायद्यातील तरतुदींची बाधा येते. त्यामुळे शेवटी त्यांनी सदरचा अर्ज नामंजुर होणेबाबत विनंती केली आहे.

७. यातील प्रतिवादी क्र.३ यांनी निशाण २० कडे आपले म्हणणे सादर केले आहे. प्रतिवादी क्र. ३ यांनी वादींच्या सर्व कथनांचा स्पष्टपणे इन्कार केला आहे. प्रतिवादी क्र. ४ यांच्या म्हणण्यानुसार त्यांचा सदर दावा मिळकतीशी कोणताही संबध नाही. वादी हे केवळ राजकीय द्वेषापोटी व प्रतिवादी क्र.३ यांच्या पत्नी या मौजे आकुर्डे च्या ग्रामपंचायत मध्ये वादींच्या विरोधात सरपंच म्हणून विजयी झाल्यामुळे दाखल केलेला आहे. वादी कथन करतात त्याप्रमाणे प्रतिवादी क्र. ३ हे दिनांक २७/०६/२०१८ रोजी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सह. बँक शाखा करडवाडी येथे शाखाधिकारी या पदावर हजर होते. त्यामुळे वादी यांनी कोणतेही

कारण नसताना राजकिय आकसापोटी सदरचा अर्ज दाखल केलेला असल्यामुळे तो नामंजुर करणेत यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

८. दोन्ही बाजुंच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

९. अर्ज, म्हणणे, प्रकरणातील कागदपत्रे आणि दोन्ही बाजुंच्या विधिज्ञांचा युक्तीवाद यावरुन पुढील मुद्दे माझ्या विचारार्थ निघतात. त्यांना मी माझी कारणांसहित उत्तरे यापुढे नमूद करीत आहे.

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | वादी प्रथमदर्शनी केस सिध्द करतात काय ? | : | होय. |
| २. | सोईस्करतेची तुला वादींच्या बाजुने आहे असे ते सिध्द करतात का ? | : | होय. |
| ३. | मागणी केलेप्रमाणे तुर्तातुर्त मनाई न दिलेस वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. असे वादी सिध्द करतात काय ? | : | होय. |
| ४. | काय आदेश ? | : | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

१०. प्रस्तुत कामी वादी यांनी खालील कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

| अ. क्र. | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|
| **निशाण क्र. ३ सोबत** | |
| १. | दावा मिळकतीच्या ७/१२ उता-याची प्रत. |
| २. | रे. क. क्र. १६१३/२०१२ मधील हुकूमनामा प्रत. |
| ३. | रे. क. क्र. १६१३/२०१२ मधील न्यायनिर्णय प्रत. |
| ४. | मौजे आकुर्डे, ता. भुदरगड येथील गावठाण सह नकाशा प्रत. |
| **निशाण क्र. १८ सोबत** | |
| १. | प्रतिवादी विरुध्द दाखल करणेत आलेल्या N. C. R. रिपोर्ट ची प्रत. |

११. प्रतिवादी यांनी खालील कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

| अ. क्र. | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|
| **निशाण क्र. ३० सोबत** | |
| १. | मौजे आकुर्डे गट क्र. ६५६ चे खरेदीपत्राची प्रत. |
| २ व ३ | गट क्र. ६५६ मधुन गेलेल्या रस्त्याचे फोटो. |
| ४. | मौजे आकुर्डे ग्रामपंचायत मिळकत क्र. ६७७ च्या घरठाण उत-याची प्रत. |
| ५. | मौजे आकुर्डे ग्रामपंचायत मिळकत क्र. ६७८ च्या घरठाण उत-याची प्रत. |
| ६. | मौजे आकुर्डे ग्रामपंचायत मिळकत क्र. ६७९ च्या घरठाण उत-याची प्रत. |
| ७. | मौजे आकुर्डे ग्रामपंचायत मिळकत क्र. ९८२ च्या घरठाण उत-याची प्रत. |
| ८. | मौजे आकुर्डे ग्रामपंचायत मिळकत क्र. १०२९ च्या घरठाण उत-याची प्रत. |
| ९ ते १४. | सदाशिव भांदिगरे, बाजीराव कोराणे, बजरंग बाबू कोराणे, जनाबाई रबाडे, राजेंद्र व्हरांबळे व सदाशिव भांदिगरे यांच्या लाईट बिलांच्या प्रति. |
| **निशाण क्र.३२ सोबत** | |
| १. | प्रतिवादी क्र. ३ हे कामावर हजर असलेबाबतचे हजेरीपत्रकाची प्रत |
| २. | रजि. दस्त क्र. १३१३/२०१८ चे खरेदीपत्राची प्रत. |

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ४ च्या अनुषंगाने</u> :**

१२. सदरचे चारही मुद्दे ऐकमेकांशी संलग्न असलेमुळे पुनरावृत्ती टाळण्याकरीता मी ते एकत्रीत विचारार्थ घेत आहे.

१३. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादी यांनी वादींच्या दावा मिळकतीमध्ये दक्षिण बाजूस पुर्व-पश्चिम असा रस्ता आखणी करु नये व दावा मिळकतीमधील पिकांचे नुकसान करु नये यासाठी प्रतिवादी विरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश होणेसाठी वादी यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

१४. वादींच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकतीशी प्रतिवादी यांचा काहीही संबध नाही. तसेच, दावा मिळकतीमध्ये दक्षिण-उत्तर गारगोटी-पाटगांव या

रस्त्याव्यतिरिक्त इतर कोणताही रस्ता अस्तीत्वात नाही. त्यामुळे केवळ राजकीय व्देषापोटी प्रतिवादी क्र.१ व प्रतिवादी क्र.३ यांनी प्रतिवादी क्र.२ यांना हाताशी धरुन दावा मिळकतीमधील दक्षिण बाजुस पुर्व-पश्चिम असा १० फुट असा रस्ता आखणेची तयारी सुरु केली आहे व त्या अनुशंगाने मुरुम टाकणेचे काम देखील चालु कले आहे. त्यामुळे वादींनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

१५. याउलट प्रतिवादींच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, सदरचा दावा हा वादींने केवळ राजकीय आकसापोटी दाखल केला आहे. तसेच, वादी कथन करतात तो रस्ता व त्यावरील मुरुम हा त्या भागातील इतर लोकांनी टाकलेला आहे. त्यामुळे त्यांनी सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

१६. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी वादीचे नांव असल्याचे दिसुन येते. तसेच, नियमित दिवाणी दावा क्रमांक १६१३/२०१२ या वादींनी जिल्हाधिकारी कोल्हापूर, तहसिलदार भुदरगड, तसेच शाखा अभियंता गारगोटी व इतर यांच्या विरुध्द दाखल केलेल्या दाव्याच्या न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता त्यामध्ये सदर दाव्यातील प्रतिवादींनी योग्य त्या कायदेशीर मार्गाचा अवलंब केल्या शिवाय वादींकडून रस्ता रुंदीकरणासाठी दावा मिळकतीचा कब्जा घेवू नये असा आदेश पारित करणेत आलेला आहे. यावर प्रतिवादींच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, सदर कामी ते पक्षकार नसल्यामुळे सदर न्यायनिर्णय या कामी लागू होत नाही. सकृतदर्शनी वादाकरीता जरी सदर न्यायनिर्णय प्रतिवादी यांना लागू होत नसला तरी दावा मिळकतीमधील रस्त्यासंदर्भात वाद असलेबाबतचे व कायदेशीर मार्गाचा अवलंब केल्या शिवाय वादींकडून रस्ता रुंदीकरणासाठी दावा मिळकतीचा कब्जा घेवू नये असा आदेश पारित असल्याचे दिसुन येतो.

१७. वादींने दाव्यासोबत दाखल केलेल्या समजुतीच्या नकाशाचे सकृतदर्शनी अवलोकन केले असता, दावा मिळकतीतुन गारगोटी-पाटगांव रस्ता गेला असल्याचे दिसून येते. याउलट, प्रतिवादींनी त्यांच्या म्हणण्यामध्ये वादी नमुद करतात तो रस्ता दावा मिळकतीमध्ये नसुन तो गट क्र. ६५६ मध्ये असल्याबाबतचे कथन केले आहे व त्याचे पृष्ठर्थ निशाण क्र. ३० वर गट क्र. ६५६ चे खरेदीपत्राची प्रत दाखल केलेली आहे. परंतु, सदर खरेदीखताचे अवलोकन केले असता सदरची बाब सकृतदर्शनी स्पष्ट होत नाही.

१८. तसेच, वादींने प्रस्तुत अर्जाच्या कामी दाखल केलेल्या निशाण क्र.१८, अ.

क्र.१ वरील भुदरगड पोलीस ठाणे येथे दाखल केलेल्या अदखलपात्र तक्रारीचे अवलोकन केले असता, केले असता प्रतिवादी क्र. ३ व इतर लोकांनी दावा मिळकतीमधील रस्त्या संदर्भात दावा दाखल असताना देखील ग्रामपंचायत मार्फत मुरुम टाकला असल्याचे व फिर्यादींने प्रतिवादीं क्र. ३ यांना या बाबत विचारपूस केली असता त्यांनी फिर्यादीस शिवीगाळ करुन मारहाण केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. याउलट प्रतिवादी क्र. ३ यांनी निशाण क्र. ३२, अ. क्र.१ वर ते सदर दिवशी नोकरीच्या ठिकाणी हजर असलेबाबतचा दाखला हजर केलेला आहे. परंतु सदरचा दाखला हा माहे जून मधील असुन घटना ही माहे जूलै महिन्यात घडलेली आहे. त्यामुळे, सदरचा दाखला येथे लागू होत नाही.

१९. प्रतिवादींच्या विधिज्ञांनी वादींनी प्रतिवादी क्र. १ व २ यांना मुंबई ग्रामपंचायत कायदा १९५८ चे कलम १८० प्रमाणे दावा पुर्व नोटीस दिली नसल्यामुळे सदरचा दावा चालणेस पात्र नसल्याचे कथन केले आहे. परंतु, *Municipality of Parola Vs. Laxmandas and another 1980 (2) (BLR 857)* या न्यायनिर्णयामध्ये provision relating to the notice under section 180(2) of the act is not applicable to the future actions असे गृहितक मांडण्यात आले आहे. प्रस्तुत प्रकरणी देखील वादींनी प्रतिवादींच्या भविष्यकालीन दावा मिळकतीमधून रस्ता तयार करणेच्या कृतीबाबत दाद मागीतलेली आहे. त्यामुळे, माझ्या मते वादींनी प्रतिवादी क्र. १ व २ यांना मुंबई ग्रामपंचायत कायदा १९५८ चे कलम १८० प्रमाणे दावा पुर्व नोटीस देणे बंधनकारक नाही.

२०. याउलट वादातील सदर रस्त्याबाबत प्रतिवादींने त्यांचे ताब्यात असलेली कोणतेही कागदपत्रे अभिलेखावर हजर केलेली नाहीत. त्यामुळे अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता सकृतदर्शनी वादींच्या कथनात तथ्य वाटते.

२१. एकंदरीतपणे, माझ्या मते वादीने सकृतदर्शनी दावा मिळकत ही त्यांच्या कब्जामध्ये असलेचे दिसुन येते. तसेच दावा मिळकतीच्या समजुतीच्या नकाशाचे व वादींनी दाखल केलेल्या तक्रारीचे अवलोकन केले असता प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न अवलंबता रस्ता आखणी करत असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. तसेच, सोयीस्करतेचा तुला व अपरिमीत नुकसानीचे तत्व हे देखील त्यांच्या बाजुने आहे. त्यामुळे प्रतिवादीने दाव्याच्या अंतिम निकालापावेतो वादींच्या दावा मिळकतीमध्ये दक्षिण बाजूस पूर्व-पश्चिम अशा रस्त्याची आखणी करुन रस्ता करु नये. तसेच, वादींचे दावा मिळकतीमधील पिकांचे नुकसान करु नये असा तुर्तातुर्त मनाईचा आदेश मिळणेस वादी पात्र असलेचे सकृतदर्शनी दिसुन येते.

२२. सबब, उपरोक्त चर्चेनुसार, दाखल न्यायानिर्णयातील तत्वे, कायद्यातील तरतुदीनुसार आणि वर नमुद कारणांकरिता मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवत आहे. व मुद्दा क्र. ४ चे उत्तरार्थ पुढील आदेश पारित करत आहे.

## आदेश.

१. वादींचा प्रस्तुत अर्ज (निशाण ५) मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादींनी अगर तर्फे इसमांनी दाव्याच्या अंतीम निकाला पावेतो वादींच्या दावा मिळकतीमध्ये दक्षिण बाजूस पूर्व-पश्चिम अशा रस्त्याची आखणी करुन रस्ता करु नये. तसेच, वादींचे दावा मिळकतीमधील पिकांचे नुकसान करु नये, असा तात्पुरत्या स्वरुपाचा मनाई आदेश देणेत येत आहे.

**स्वाक्षरी/-**

( अ. सु. कोष्टी )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गारगोटी.

स्थळ : गारगोटी.
दिनांक : १३/०६/२०१९.

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Mr. R. S. Chavan. |
| Name of Court | : | Court of Civil Judge Junior Division, Gargoti, Tah. - Bhudargad, District – Kolhapur |
| Date of Dictation | : | 13/06/2019 |
| Order signed by the P.O. on | : | 13/06/2019 |
| Order uploaded on | : | 13/06/2019 |